। लातूर । वर्ष ३४ वे । अंक २३५ वा । गुरूवार, दिनांक ११ डिसेंबर २०२५ । पृष्ठे ६ । किंमत १ रू.

RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR

(सांज दैनिक)

प्रकाशन: लातूर

पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

Email-dainiklatursamachar@gmail.com

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक) कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

# ई-केवायसीच्या गोंधळात ५.४२ लाख शेतकरी अडकले

## ३५५ कोटींची रक्कम तांत्रिक अडथळ्यांमुळे शिल्लक

**मुंबई/प्रतिनिधी :**अतिवृष्टीमुळे आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा मिळावा म्हणून राज्य सरकारने जाहीर केलेले ३१ हजार ६२८ कोटी रुपयांचे मदत पॅकेज मोठ्या अपेक्षेने समोर आले होते. नैसर्गिक आपत्तीमुळे कोसळलेल्या पिकांचे नुकसान भरून काढण्यासाठी ही मदत तातडीने शेतकऱ्यांच्या खात्यात पोहोचेल, अशी आशा होती. शासनाने निधीची तरतूद करून अनेक उपाययोजना जाहीर केल्या, परंतु प्रत्यक्षात मदतीचा प्रवास शेतकऱ्यांपर्यंत पोहोचताना मोठ्या प्रमाणात तांत्रिक अडथळे आडवे आल्याचे स्पष्ट झाले आहे.

ई-केवायसी पूर्ण नसणे, आधार आणि बँक नोंदीतील विसंगती, तसेच पोर्टलशी संबंधित त्रुटींमुळे अनेकांचे अर्ज अपूर्ण स्थितीत राहिले आहेत. यामुळे सुमारे ५ लाख ४२ हजार १४१ शेतकऱ्यांच्या नावावरची ३५५ कोटी ५५ लाख रुपयांची मदत अद्याप शासनाकडेच अडकून आहे. मुख्य सचिवांकडून घेतलेल्या आढाव्यात ही गंभीर बाब समोर आली असून, प्रशासनाची गतीमानता आणि यंत्रणांची कार्यक्षमता याबद्दल मोठे प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

मराठवाडा हा अतिवृष्टीचा सर्वाधिक फटका बसलेला क्षेत्र असल्याने निधी अडकल्याचा सर्वात



मोठा भारही या भागातील शेतकऱ्यांवरच पडला आहे. छत्रपती संभाजीनगर विभागात एकूण १६५ कोटी ७२ लाख रुपयांची रक्कम प्रलंबित राहिल्याचे स्पष्ट झाले आहे. बीड जिल्ह्यातच २९ हजार ५०४ शेतकऱ्यांचे १५ कोटी ७२ लाख रुपये अडकले आहेत. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात ४५ हजार ४८२ शेतकऱ्यांना २८ कोटी ५१ लाख रुपयांची रक्कम मिळालेली नाही, तर धाराशिव जिल्ह्यात २४ हजार ९१४ शेतकऱ्यांसाठी राखीव ठेवलेले १७ कोटी ७७ लाख रुपये अद्याप वितरणाच्या प्रतीक्षेत आहेत. याशिवाय, हिंगोलीतील १३ हजार १५१ शेतकऱ्यांचे ८ कोटी २६ लाख, जालना जिल्ह्यातील ३८ हजार ९९० शेतकऱ्यांचे २ कोटी ३३ लाख, नांदेडमधील तब्बल ५५ हजार ८११ शेतकऱ्यांचे ३१ कोटी ५६ लाख आणि परभणी जिल्ह्यातील ४५ हजार ७७५ शेतकऱ्यांचे २२ कोटी ५७ लाख रुपये शासनाच्या खात्यातच शिल्लक आहेत. या साऱ्यामुळे मराठवाड्यातील हजारो शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती अधिकच बिकट बनली आहे.

राज्याच्या इतर विभागांतही मदत वितरणाचा वेग अत्यंत मंद असून मोठ्या प्रमाणात निधी शासन तिजोरीत न वापरता पडून असल्याचे लक्षात आले आहे. नाशिक विभागात ५० कोटी २१ लाखांची रक्कम अद्याप अडकली आहे, तर अमरावती विभागात सर्वाधिक ८३ कोटी ९ लाखांचा निधी अडथळ्यामुळे पुढे सरकलेला नाही. नागपूरमध्ये ३३ कोटी १ लाख, पुणे विभागात २० कोटी २९ लाख आणि कोकणात ३ कोटी २७ लाख रुपये शेतकऱ्यांच्या खात्यांमध्ये जमा न होता शासनाकडेच ठेवलेले आहेत. या सर्व प्रकरणांमध्ये एकाच मुद्द्याचा प्रभाव स्पष्टपणे दिसत आहे. ई-केवायसीची अपूर्णता हा मोठा अडथळा ठरला आहे. बँक आणि आधार जोडणीतील चुका, नावांमध्ये झालेल्या स्पेलिंगच्या विसंगती, तसेच पोर्टलवरील डेटा अपलोडिंगमधील त्रुटी यांनी निधी वितरण प्रक्रियेवर मोठा परिणाम केला आहे.

योजनेनुसार तातडीने मदत मिळेल, या अपेक्षेने अनेक शेतकरी दिवसेंदिवस बँका, इंटरनेट सेंटर आणि सरकारी कार्यालयांचे चकरा मारत आहेत. मात्र, प्रक्रियेतील तांत्रिक गुंतागुंत लक्षात घेता त्यांना अद्यापही मदतीसाठी थांबावे लागत आहे. हवामान बदलामुळे वारंवार येणाऱ्या अतिवृष्टीने आधीच शेतकऱ्यांचे अर्थकारण कोलमडले आहे आणि त्यात मदतकपातीचे हे नवीन संकट उभे राहिल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरत आहे. प्रशासनाच्या त्रुटींमुळे हक्काची मदत रोखली जाणे अन्यायकारक असल्याचे ग्रामीण भागात ठामपणे व्यक्त केले जात आहे. अनेक शेतकऱ्यांनी याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींना तक्रारी दिल्या असून प्रक्रियेचा वेग वाढवावा, अशी मागणी सतत होत आहे.

### ऑन-द-स्पॉट ई-केवायसी सुविधा उपलब्ध करून द्यावी

दरम्यान, शासनाकडून मदत पोहोचण्यात झालेला विलंब लक्षात घेऊन ई-केवायसी आणि पडताळणी प्रक्रियेची सुधारणा करण्यासंदर्भात आता अपेक्षा व्यक्त होत आहे. शेतकऱ्यांच्या खात्यांमध्ये थेट लाभ पोहोचवण्यासाठी व्यापक मोहीम राबवावी, ग्रामीण भागात केंद्रे उभारून ऑन-द-स्पॉट ई-केवायसी सुविधा उपलब्ध करून द्यावी, तसेच पोर्टलवरील त्रुटींचे निराकरण करावे, अशा अनेक मागण्या पुढे येत आहेत. ही मदत आर्थिकदृष्ट्या कमकुवत झालेल्या शेतकऱ्यांसाठी जीवनदायिनी ठरू शकते, त्यामुळे शासनाने तातडीने पाऊले उचलणे आवश्यक असल्याची भावना सर्व स्तरांतून व्यक्त होत आहे.


# मटका जुगार अवैध खेळताना व खेळविताना व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल

## ४८,६००/ रुपयेचा मुद्देमाल जप्त; लातूर पोलिस अधीक्षकांच्या विशेष पथकाची विवेकानंद पोलीस ठाणे हद्दीत कारवाई

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर शहरामध्ये महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेल्या मटका जुगार अवैध खेळताना व खेळविताना सापडले असून लातूर पोलिस अधीक्षक कार्यालयाच्या विशेष पथकाने मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत रोख रक्कम व जुगाराचे साहित्य असा एकूण ४८,६०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

लातूर जिल्ह्यातील अवैध धंद्यावर कारवाई करण्यासंदर्भात पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी अवैध धंद्यावर कठोर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.

त्या अनुषंगाने अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाचे पोलीस उपनिरीक्षक आयुब शेख यांच्या नेतृत्वाखालील पथकाला दि. १० डिसेंबर २०२५ रोजी मिळालेल्या माहितीच्या आधारे, विवेकानंद पोलीस ठाणे हद्दीतील बनसोडे नगर, अंबाजोगाई रोड लातूर येथे अवैध सुरू असलेल्या मटका जुगार कारवाई करत छापेमारी केली. सदर छापे मारीत गणी राहणार पठाण नगर लातूर, बनसोडे राहणार बनसोडे नगर लातूर. हे व्यक्ती



मटका जुगार चालवीत असताना वर नमूद रक्कम व जुगाराचे साहित्यसह मिळून आल्याने त्यांच्यावर पोलीस ठाणे विवेकानंद चौक लातूर येथे गुन्हा दाखल करून अटक करण्यात आलेली आहे.सदरचा मटका जुगार खेळामधून मिळालेली ठराविक रक्कम गिरी यास देत असल्याचे चौकशीत समोर आले आहे.

या कारवाईत एकूण ४८६००/- रोख रुपयेचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर व्यक्तींना ताब्यात घेऊन त्याच्याविरुद्ध विवेकानंद चौक पोलीस ठाणे, लातूर येथे गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

ही कारवाई वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली विशेष पथकाचे पोलीस उपनिरीक्षक आयुब शेख यांच्या नेतृत्वात पोलीस अंमलदार श्रेणी पोलीस उपनिरीक्षक उत्तम जाधव, पोलीस अंमलदार युसुफ शेख, रामहरी भोसले, यशवंत घुगे, दीपक वैष्णव यांनी केली आहे.

# १०० फुटांचा रोड होतोय ३३ फुटांत; राज्य रस्ते विकास मंडळाचा अजब कारभार

**देवणी/प्रतिनिधी :**शहरातून जात असलेला शिरूर अनंतपाळ - देवणी गुरनाळ हा रोड महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून बनविण्यात येत आहे. मुख्यतः हा रस्ता तळेगाव-नेकनाळ देवणी हा १०० फूट रुंदीचा आहे मात्र ३३ फुटाचा होत असल्याने प्रशासनाचा हा अजब कारभार असल्याची चर्चा शहरासह तालुक्यात आहे. शहरातील हा मोठ्या वर्दळीचा रोड असल्याने हा रोड ३३ फुटा ऐवजी मोठा करावा अशी मागणी नगरपंचायतीच्या वतीने करण्यात आली आहे.

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून टेंभुर्णी- लातूर - शिरूर अनंतपळ देवणी गुरनाळ हा रस्ता रुंदीकरण व मजबुतीकरणासाठी रस्ते विकास महामंडळाकडून बनविण्यात येत आहे. हा रोड देवणी शहरातून कुंभार गल्ली- पुण्यश्लोक अहिल्या होळकर नगर पोलीस स्टेशन एम एस ई बी-लासोना चौक या प्रमुख वर्दळीच्या ठिकाणाहून जात आहे.

हा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाकडे येत असून हा रोड १०० फुटांचा असला तरी रस्ते विकास महामंडळाकडून हा रस्ता केवळ ३३ फुटाचा बनविण्यात येत आहे. त्या रोडच्या दोन्ही बाजूस १ मीटरची नाली व १ मीटरचा शोल्डर बनविण्यात येत असल्याने हा रोड मध्यभागी घेऊन उर्वरित रोडची जागा नालीच्या दोन्ही बाजूस शिल्लक राहत आहे.

यामुळे नालीचे बांधकाम रोडच्या दोन्ही बाजूच्या टोकास म्हणजेच शंभर फूट हद्द करून त्या शेवटच्या टोकास नालीचे बांधकाम करावे. जेणेकरून रोड मोठा होईल व त्या रोडवरती नागरिकांचे अतिक्रमण ही होणार नाही. उर्वरित रोडचे काम अंदाजपत्रकाप्रमाणेच करावे अशी मागणी नगरपंचायतीच्या वतीने करण्यात आली आहे. १०० फूट रोडच्या दोन्ही टोकास नाली बांधकाम करावे व उर्वरित रोडचे काम करावे.

तळेगाव - नेकनाळ - देवणी हा राज्यमार्गाचा दर्जा असल्याने हा रोड १०० फुटांचा आहे. सध्या महाराष्ट्र राज्य रस्ते विकास मंडळाकडून होत असलेल्या रोडचे काम रोड नाली व शोल्डर हे सर्व मिळून ४५ फुटांमध्येच बनवत आहेत. उर्वरित ५५ फुटांवर रोड शिल्लक राहत आहे. या ५५ फुटांवर नागरिकांचे अतिक्रमण होण्याची शक्यता मोठ्या प्रमाणात आहे. सदरील रस्त्यावर पोलिस स्टेशन, शाळा, महाविद्यालय, महावितरण कार्यालय, गोडावून असे शासकीय व निमशासकीय कार्यालय असल्याने या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वाहतुक, नागरिक व शाळकरी मुलांचे वर्दळ आहे. त्याकरिता हा रोड मोठे होणे गरजेचे आहे. या १०० फुटाच्या रोडच्या हद्द कायम करून रोडच्या दोन्ही टोकास नालीचे बांधकाम करून उर्वरित रोड व शोल्डरचे काम करावे जेणेकरून वाहतुकीस अडथळा निर्माण होणार नाही.

**-डॉ. कीर्तीताई संजय घोरपडे**
**नगराध्यक्षा नगरपंचायत, देवणी**

# हरंगुळ (बु.) व वरवंटी परिसरात एमआयडीसीचे दूषित पाणी; नागरिकांच्या जीवितास धोका

## भाजप नेत्या डॉ. अर्चना पाटील चाकुरकर यांचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**लातूर/प्रतिनिधी :** हरंगुळ (बु.) मंदार वस्ती आणि मौजे वरवंटी (बसवंतपूर) परिसरातील नागरिकांना लातूर चखऊ मधून नाल्याद्वारे येणाऱ्या दूषित पाण्याचा प्रचंड त्रास होत असून नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम दिसत आहेत. या गंभीर समस्येबाबत भारतीय जनता पक्षाच्या नेत्या डॉ. अर्चना पाटील चाकुरकर यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदनाद्वारे तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

निवेदनात नमूद केले आहे की, एमआयडीसी मधील सांडपाणी थेट नाल्यात सोडले जात असल्याने ते लोकवस्तीमध्ये मिसळत आहे. परिणामी नागरिकांच्या अंगावर पुरळ, एलर्जी, त्वचारोग यांसारख्या समस्या मोठ्या प्रमाणावर वाढल्या आहेत. विशेषतः महिला आणि लहान मुलांचे आरोग्य गंभीर धोक्यात आल्याचे नमूद केले आहे.




डॉ. चाकुरकर यांनी सांगितले की, नागरिकांनी अनेक वेळा तक्रारी करूनही योग्य तो परिणामकारक पाणी व्यवस्थापन केले गेलेले नाही. त्यामुळे दूषित पाणी थेट लोकवस्तीत येत असून नागरिकांच्या जीवितास प्रत्यक्ष धोका निर्माण झाला आहे.

निवेदनात पुढे असा उल्लेख करण्यात आला आहे की महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने पर्यावरण अधिनियम १९८७ अंतर्गत चखऊ वर कठोर कारवाई करावी. तसेच दूषित पाणी बाहेर जाण्याची व्यवस्था तात्काळ बंद करून त्याची योग्य विल्हेवाट लावण्यासाठी तातडीच्या उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे.

शेवटी, डॉ. अर्चना पाटील चाकुरकर यांनी प्रशासनाने प्रत्यक्ष पाहणी करून नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न लक्षात घेऊन त्वरित कारवाई करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

## कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



**लाडकी बहीण योजनेमध्ये बोगस लाभार्थ्यावर कारवाई सुरू...**



## चिमटा दयाचा

**लातूर-टेंभुर्णी रस्त्याच्या कामाला गती कधी मिळणार ! रखडलेले उर्वरित कामास गती कधी येणार !! सरकारी काम अनेक महिणे थांब असेच दिसते !!**

# जिल्हास्तरीय साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार यांची निवड

**लातूर/प्रतिनिधी :** श्री अनंतपाळ नवयुवक वाचनालय, शिरूर अनंतपाळ यांच्या पुढाकारातून आणि महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई यांच्या अनुदानातून होत असलेल्या जिल्हा साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार यांची एकमताने निवड करण्यात आली.

महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाच्या अनुदानातून प्रत्येक जिल्ह्याला एक मराठी साहित्य संमेलन या वर्षीपासून होत आहे. लातूर जिल्ह्यात शिरूर अनंतपाळ येथे दि. २७ व २८ डिसेंबर २०२५ रोजी हे संमेलन होत असून या संमेलनाच्या अध्यक्षपदी निवडीचे पत्र श्री अनंतपाळ नवयुवक वाचनालयाचे अध्यक्ष श्री एल.बी.आवाळे यांनी दिले.

ज्येष्ठ विचारवंत, शिक्षण तज्ज्ञ आणि विचारशलाकाचे संपादक म्हणून प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार यांचा लौकिक आहे. डॉ. कुंभार यांनी लातूर येथे १९८७ ला विचारशलाका त्रैमासिक स्थापना केली. सामाजिक आणि राष्ट्रीय समस्यांची सैद्धांतिक उकल करून स्वातंत्र्य, समता, बंधुता, धर्मनिरपेक्षता व वैज्ञानिक दृष्टीचा समाज निर्माण करण्यासाठी विचारशलाका त्रैमासिक प्रयत्नशील आहे. समाजातील दलित, वंचित, शोषित, आदिवासी व विमुक्त वर्गांच्या हक्कासाठी ते प्रयत्नशील



असतात. मराठवाड्यातील सामाजिक विचारांची चळवळ अधिक विस्तारित करण्याचे कार्य त्यांनी सातत्याने केले आहे. मराठी वैचारिक, परिवर्तनशील व प्रबोधन वाड:मयात मौलिक योगदान डॉ. कुंभार यांचे आहे. मराठी वैचारिक साहित्याला त्यांचे मौलिक योगदान आहे.

न्याय संकल्पना हा विचारशलाकाचा पहिला अंक होता. चाळीस वर्षांपासून विचारशलाकाचे संपादक म्हणून डॉ. कुंभार यांनी सामाजिक प्रबोधन कार्यात स्वतःला वाहून घेतले आहे. घटनात्मक मूल्याधिष्ठित समाज निर्मितीसाठी सतत कार्यरत आहेत. धर्मनिरपेक्षता विशेषांक, लोकशाही, समता, ग्रामीण विकास, मंडल आयोग, तत्त्वज्ञान, उदारमतवादी, सामाजिक चळवळी, विचारवंत व समाज, भारतीय समाजासमोर आव्हाने, प्रबोधन विशेषांक, भारतीय राज्यघटना, दहशतवाद विशेषांक, संत साहित्य विशेषांक, गुलामगिरी आणि विचार अभिव्यक्ती विशेषांक, स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवी विशेषांक, बौद्ध तत्त्वज्ञान विशेषांक तर महाराष्ट्राच्या पुरोगामी परंपरेला वाहून घेणाऱ्या सामाजिक विचारवंतावर विचारशलाकाचे अत्यंत महत्त्वपूर्ण विशेषांक त्यांनी प्रकाशित केलेले आहेत. यामध्ये गं. बा. सरदार, पंडित जवाहरलाल नेहरू, म. ज्योतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राजर्षी शाहू महाराज, साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे, आचार्य शं. द. जावडेकर, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, गोपाळ गणेश आगरकर, महात्मा गांधी, यशवंतराव चव्हाण, जे. कृष्णमूर्ती विशेषांक, अमर्त सेन, धनंजयराव गाडगीळ, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, ना.य. डोळे, प्राचार्य हेमचंद्र धर्माधिकारी, ग.प्र. प्रधान गौरवांक, वसंतराव काळे, रा.ना. चव्हाण यांच्या कार्यावर विशेषांक प्रकाशित आहेत. अनेक विशेषांकातून प्रबोधनाची पायवाट अधिक विस्तारित केलेली आहे.

याशिवाय भ्रष्टाचार स्वरूप आणि समस्या, सामाजिक कार्याच्या दिशा, आरक्षण का व कसे?, समता स्वरूप व समस्या, न्याय म्हणजे काय?, लोकशाही स्वरूप व समस्या, डॉ. राधाकृष्णन व्यक्ती व विचार आदी पंचवीस ग्रंथांचे लेखन त्यांनी केलेले आहे.

प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार, महाराष्ट्र शासन दर्शनिका संपादक मंडळ मुंबई, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य माध्यमिक उच्च माध्यमिक मंडळ सदस्य होते. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडचे ते पहिले सामाजिकशास्त्राचे अधिष्ठाता आणि व्यवस्थापन परिषदेचे सदस्य होते. तत्त्वज्ञान व तर्कशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम केलेले आहे. त्यांच्या कार्याला महाराष्ट्र फाउंडेशन पुरस्कार, अखिल भारतीय समाजनिष्ठ शिक्षक पुरस्कार, महाराष्ट्र साहित्य परिषद पुणेचा शं. वा. किर्लोस्कर श्रेष्ठता पुरस्कार, महाराष्ट्र शासनाचा डॉ. आंबेडकर दलित मित्र पुरस्कार, वर्धा येथील दाते संस्थेचा जीवनगौरव पुरस्कार, सातारा येथील संस्थेचा म.फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

त्यांच्या या निवडीबद्दल सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# १० टन गोवंश मांसाची वाहतूक करणारा आयशर ट्रक पकडला; चाकूर पोलिसांची मोठी कारवाई; दोघे ताब्यात, चौघांवर गुन्हा

चाकूर (लातूर) : तालुक्यातील नळेगाव-उदगीर रोडवरील टोलनाक्याजवळ १० टन गोवंश मांसाची अवैध वाहतूक करणारा आयशर ट्रक पोलिसांनी मंगळवारी (दि. १०) सकाळी १०.१५ वाजता पकडला. याप्रकरणी पोलिसांनी चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून घटनास्थळावरून दोघांना ताब्यात घेतले आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नळेगाव-उदगीर रोडवरून गोवंश मांसाची वाहतूक होणार असल्याची माहिती मिळाली होती. त्यावरून पोलिसांनी सापळा रचला असता, एम. एच. १७सी. व्ही. ३५४९ क्रमांकाचा आयशर ट्रक संशयास्पद रित्या येताना दिसला. पोलिसांनी ट्रक थांबवून तपासणी केली असता, त्यात १० टन गोवंश मांस आढळून आले. गोवंश हत्या व मांस विक्रीस बंदी असतानाही ही वाहतूक केली जात होती.

याप्रकरणी ट्रकसह नदीम खान मोहम्मद (रा. नाईकवाडापूर, संगमनेर, जि. अहिल्यानगर) आणि फारुख कसम शेख (रा. कसम यासीन शेख चाळ, कुर्ला वेस्ट, मुंबई) या दोघांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## वादाचे विषय नको तर विचार करा

देशात आलीकडे वादाचे विषय उकरून काढून वाद निर्माण होताना दिसून येत आहे. भारत हा देश जगाच्या पाठीवर असा आहे की, येथे सर्व जाती व धर्माच्या लोकांना मोकळीक आहे. इतर देशात कडक कायदे आहेत. कठोर शिक्षा आहे. देशाविरोधात बोलण्याची कोणाची हिंमत होत नाही. त्याच प्रमाणे ज्या देशाचा धर्म आहे त्याचेच अनुकरण केले पाहिजे. ख्रिश्चन किंवा ईस्लामी संस्कृती असेल तर त्याचे पालन केले पाहिजे. इतराचे काही चालत नाही, नसता जीवास मुकावे लागते. इस्लाम धर्माविषयी कोणी साधे काही बोलले तर खैर नाही. वास्तविक हिंदु सोडला तर प्रत्येकात अभिमान दिसून येतो. आता नवीन धार्मिकस्थळ बांधण्यावर वाद निर्माण होण्याची शक्यता आहे. प. बंगाल प्रांतातील आमदाराने उचललेले पाऊल आहे. त्या आमदारास ममता बॅनर्जी यांनी बडतर्फ केले आहे. वास्तविक धार्मिकस्थळ किंवा पुतळे कशासाठी उभारले जातात. याचा विचार केला तर त्यांचे अनुकरण करण्यासाठी किंवा त्यांची आठवण स्मरणात राहावी यासाठी निर्माण केले जातात. असे असताना केवळ वाद निर्माण करण्यासाठी याची उभारणी केली जाऊ नये. सर्वानुमते उभारणी आवश्यक आहे. असे न होता कोणी पुढारी पुढे येऊन सामाजिक परिस्थिती बिघडविण्याचा प्रयत्न करीत असेल तर ते योग्य नाही. कोणतेही धार्मिकस्थळ असो हे लोकसहभागातून उभारली पाहिजेत. त्यांच्या मागणीतून झाले पाहिजे. सर्वजन धार्मिकतेच्या शिकवणीनुसार चालले तर हिंसा घडू शकत नाही. हिंसेची शिकवण कोणत्याही धर्मात सांगितली नाही. धार्मिकता ही मानवता शिकवली जाते. असे असताना सध्याला धर्माच्या आडून हिंसा घडविली जाते हे पहलगाम येथील प्रकारावरून दिसून येते. देशात चांगल्या मानसाचे पुतळे उभा केली जातात. त्याच प्रमाणे चांगली धार्मिकस्थळे निर्माण केले जातात. प. बंगाल मधील जे धार्मिकस्थळ उभा करण्याचा मनोदय व्यक्त केला गेला तो योग्य नाही. बाबर कोण होता. त्याने मानवतेची शिकवण दिली का? त्याने काय कार्य केले. मुळात हिंदुचे अधिक धर्म स्थळ होती. आर्य संस्कृती म्हणजे वैदिक संस्कृती अनंत काळापासूनच आहे. अनंत काळापासून हिंदु संस्कृती चालू आहे व होती. रामायाण-महाभारताच्या काळाच्या पुर्वीपासून हिंदु संस्कृती दिसून येते. भारतावर मोगलाचे आक्रमण झाले. हिंदु एक नसल्याचा फायदा मोगल साम्राजांनी घेतला. मोगल हे श्रीमंत होते. त्यांचे साम्राज्य मोठे होते. जगात ईस्लाम संस्कृती मोठी आहे. अनेक देश इस्लामीक संस्कृतीचे आहेत. असे असताना दुसऱ्या संस्कृतीवर आक्रमण मोगलाच्या काळात झाले. हिंदुचे धार्मिक स्थळे बळाचा वापर करून पाडली. तेथे त्यांची धर्माची स्थळे निर्माण केली हा इतिहास सांगतो. मोगलाचे साम्राज्य ताकदवान होते. त्यानुसार वाटचाल होती किंवा असणे स्वाभाविक आहे. मुळात आपल्या देशात अनेकांनी स्वाऱ्याकरून प्रचंड प्रमाणात सोने लुटले. भारत हा देश सोन्याची चिडीया म्हणून ओळखला जात होता. त्यानुसार वाटचाल होती अशी सोन्याची खाण महोमद गजणी सारख्यांनी लुटली. भारताचा इतिहास अभ्यासला तर लुटणारे कोण होते हे सहज कळून येते. तरी भारतीयांचे डोळे उघडले जात नाहीत. सोमनाथ मंदीर कोणी लुटले. बिहारमधील धार्मिकग्रंथ जाळून पाणी तापविणारे कोण होते. याबाबत विचार केला जात नाही. आता पुन्हा वाद निर्माण होणाऱ्याबाबी घडणार असतील तर ते योग्य नाही. ते रोखले पाहिजे. वेळीच सावध झाले पाहिजे. देशात अनेक धार्मिक स्थळे आहेत. विविध जाती व धर्माचे स्थळे असताना देखिल वाईट प्रकार घडतात. चोऱ्या, खुन, अत्त्याचार नको ते प्रकार घडताना दिसून येतात, याचा अर्थ धर्माने कोणी वागत नाही. चालत नाही. अधर्माने वाटचाल सुरू असताना ते रोखले जात नाही. ज्वलंत उदा. म्हणजे पहलगाम येथील घटनेवरून दिसून येते. त्याच प्रमाणे पुतळे व धार्मिकस्थळे हे मानवतेचे शिकवण देतात. चुकीचा मार्ग निवडला जात असेल तर ते सुधारण्यासाठी पुतळयाकडे पाहुन चालावे हा उद्देश आहे. मुळात काही लोक वादाचे मुद्दे उपस्थित करून शांतात भंग करण्याचा जो प्रयत्न करीत आहेत त्याचा बंदोबस्त वेळीच केला पाहिजे. सध्याला देशात जे वातावरण दिसून येत आहे ते काहींच्या पोटात दुखत असल्याने वादग्रस्त मुद्दे उपस्थित करून हिसा घडविण्याचा डाव असल्याचे दिसून येत आहे. नवीन वादग्रस्त धार्मिक स्थळाची उभारणी प. बंगालमध्ये उभाण्याचा जो मनसुबा व्यक्त केला आहे तो वादग्रस्त ठरणारा आहे. मुळात राष्ट्रीय हीताच्या बाबी नजरेआड केल्या जात आहेत. म्हणून वादग्रस्त मुद्दा उकरून काढला जात आहे. वादाच्या मुद्दा उपस्थित केला तर मंदीर प्रेमी उठाव करतील. त्यामुळे देशात शांतत राहावी असेच काम हाती घेणे उचित ठरणारे आहे. वास्तविक सध्याला वंदेमातरम् बाबत जो वादंग विनाकरण निर्माण होत आहे हे योग्य नाही. वास्तविक ठराविकांचा काम हे जनभावनेच्या विरोधात करणे हाच आहे. त्यामुळे नवा वाद निर्माण करून अशांतात निर्माण करण्याचा जो प्रयत्न सुरू आहे याला कायद्याने पायबंद घातला पाहिजे. मुळात वादग्रस्त मुद्दे उखरून काढले जात आहेत. प.बंगाल, आसाम अशा वादाचे ठिकाण आहेत. येथेच काही प्रमाणात अविचाराने बोलणारे आहेत. धार्मिक स्थळ व पुतळे पाहुन कोणीही वाईट वागू नये. आदर्श असणारी ठिकाणाहून आदर्श अंगीकारला पाहिजे. देखावे म्हणून वाटचाल होत असेल तर ते योग्य नाही. भारत हा हिंदु राष्ट्र म्हणून निर्माण झाला. पाकिस्तान भारतापासून निर्माण झाला. तेंव्हा पासून वाद आज पर्यंत होत असेल तर हे मोठे दुर्देवी बाब आहे. झाले ते झाले. यापुढे वाईट किंवा अप्रिय घडू नये याची खबरदारी घेणे योग्य ठरणारे आहे. मुळात काही ठिकाणी वाद निर्माण केला जातो आहे. यावर त्वरीत निर्बंध आणणे आवश्यक आहे. नसता विनाशाकडे वाटचाल दिसून येवू शकते. मानवता व अहिंस ही मुलभुत तत्त्व आहेत ती जोपासली पाहिजेत. वादाचे मुद्दे उकरून काढू नयेत. यापासून काहीच फायद्याचे होणार नाही.

# शीत लहरीच्या प्रकोपात पशुपालकांनी काय करावे.. करू नये..

सध्या थंडीचे प्रमाण वाढत असून याम शीत लहरीच्या प्रकोप्रात शेतकरी व पशुपालक यांच्या पशुधनाचे आर्थिकदृष्ट्या नुकसान होऊ नये यासाठी शीत लहरींपासून पशुधनाचा बचाव करणे आवश्यक आहे. शीत लहरींच्या प्रकोपाच्या तीव्रतेपासून संरक्षण करणे, अनुषंगिक आजार व मर्तुक नियंत्रीत करण्यासाठी कोणत्या उपाययोजना उपयुक्त आहेत याविषयी जाणून घेऊया..

शीत लहरीमध्ये नवजात वासरे, कालवडी / गोऱ्हे / वगारी / रेडक / मेंढ्या व शेळ्यांचे करडं, आजारी पशुधन तसेच श्वसन संस्थेचे विकार असलेले पशुधन, दुभते पशुधन, अशक्त पशुधन हे उच्चतम जोखीम असलेले पशुधन आहे. शीतलहरीमुळे होणाऱ्या हायपोथर्मिया, फ्रॉस्ट बाईट, भूक मंदावणे, मोठ्या पशुधनात सांधे दुखी, कुत्र्यांच्या पिलात खोकला, श्वसन विकार आदिंवर उपाययोजना पुढीलप्रमाणे आहेत.

**काय करावे**

स्थानिक हवामानाच्या अंदाजाची अद्यावत माहिती ठेवावी.

वातावरणातील तीव्र बदलापासून पशुधनाचा बचाव करण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनांची तयारी करून ठेवावी.

पशुधनाचा थंड वाऱ्यापासून बचाव करण्यासाठी त्याचा निवारा चहू बाजूने आच्छादित करावा, पत्र्याचे छत असल्यास त्यावर वाळलेले गवत अथवा कडब्याचा थर पसरावा तसेच पशुधनास निवाऱ्यातील जमिनीतील थंडी पासून बचावासाठी वाळलेल्या चाऱ्याचा थर / बिछाना अंथरावा.

पशुधनाचा निवारा शीत ऋतुत जास्त सुर्य प्रकाश पुरविणारा व उन्हाळ्यात सुर्य किरणांच्या तिव्रतेपासून बचाव करणारा असावा.

कडाक्याची थंडी असल्यास निवाऱ्यात कृत्रिम प्रकाश व उष्णता पुरवायची सोय करावी.

अशक्त व आजारी पशुधनास थंडी पासून बचावाकरीता झाकण्यासाठी पोती / बारदान यासारखी सोय असावी. तसेच रात्री सर्व पशुधन उबदार निवाऱ्यात ठेवावे.

पशुधनास ओलाव्यापासून दूर ठेवावे, तसेच उष्णतेसाठी शेकोटी पेटविली असेल तर त्यापासून निघणाऱ्या धूरापासून त्यांचा बचाव करावा, ओलसरपणा ओलावा व धूर यामुळे पशुधनास न्युमोनिया होण्याची शक्यता असते.

पशुधनाच्या शरीराचे तापमान नियंत्रित राहावे यासाठी विशेष करून लहान वयाच्या व अशक्त पशुधनास पेंड व गुळ देण्यात यावे. तसेच त्यांना उबदार जागी ठेवण्याची सोय असावी.

पशुधनासाठी उच्च दर्जाच्या चारा व पशुखाद्याचा मुबलक साठा असावा.

सुधारीत पशुपोषण पध्दती व पुरक खाद्य वापरावेत.

पशुधनास जंत / कृमी नाशके देण्यात यावे.

पशुधनांचा बाह्यपरजीवी किटकांपासून बचाव करण्यासाठी त्यांच्या निवाऱ्यात स्वच्छता ठेवावी तसेच निरगुडी, तुळस, लेमन ग्रास यांच्या जुड्या गोठ्यात लटकवाव्या, त्या वासाने बाह्य परजीवीं किटक पशुधनाच्या निवाऱ्यात येण्याची शक्यता कमी होते, निवाऱ्याच्या / गोठा स्वच्छतेसाठी कडूनींबाचा तेल असलेले निर्जंतुकीकरण द्रावण वापरता येईल.

पशुधनाच्या संवर्गानुसार लाळ खुरकुत, घटसर्प, फऱ्या, पीपीआर, आंत्रविषार, इत्यादी रोग प्रतिबंधक लस देण्यात यावी.

पशुखाद्यातून व पाण्यातून पुरेसे क्षार पुरविण्यात यावेत. दुभत्या पशुधनास संतुलित्त आहार व पुरक स्निग्ध खाद्य पुरविण्यात यावेत.

पशुधनाच्या पाणी पिण्याची भांडी स्वच्छ असावित तसेच पशुधनास दिवसातुन ४ वेळेस कोमट पाणी पिण्यास द्यावे.

सहा महिन्या पुढील गर्भधारणा असलेल्या पशुधनास वाढीव खाद्य द्यावे.

पक्षांच्या पिंजऱ्यांचे तापमान नियंत्रित राहण्याकरीता आवश्यक ती उपाययोजना करावी,

मृत पशुधनाच्या विल्हेवाटीची जागा ही सार्वजनिक जागा व पाणवठ्यापासून दूर असावी. तसेच ती जागा काटेरी कुंपनाने संरक्षित असावी आणि तेथे फलक लावण्यात यावा.

**काय करू नये**

शीत लहरीच्या काळात पशुधनास उघड्यावर बांधू नये, तसेच मोकाट सोडू नये.

शीत लहरीमध्ये पशु मेळाव्यांचे आयोजन टाळावे.

पशुधनास पिण्यास थंड पाणी देऊ नये.

पशुधनाच्या निवाऱ्यात ओलसरपणा व धूर टाळावा.

रात्री व थंडीत पशुधनास उघड्यावर बांधून ठेऊ नये.

मृत पशुधनाचे शव कुरणावर अथवा चरावयाच्या मार्गात टाकू नये.

या सर्व उपाय योजनांसोबतच शेळी-मेंढी-कुक्कुटपक्षांमध्ये शीत लहर कालावधीत पुढीलप्रमाणे काळजी घेण्यात यावी.

शीत लहरीच्या कालावधीत शेळ्या मेंढ्यांची घ्यावयाची काळजी

स्थलांतर करणाऱ्या व रानात शेळी-मेंढी बसवणाऱ्या पशुपालकांनी विशेष खबरदारी घ्यावी. शक्यतो पशुधनास बंदीस्त उबदार निवारा मिळेल याची दक्षता घेण्यात यावी.

शेळ्या मेढ्यांना रानात बसवले असेल तर उबदार आच्छादने लपेटावीत.

शरीरात लवकर उर्जा निर्माण होण्यासाठी कर्बोदक युक्त खाद्य प्राधान्याने देण्यात यावे परंतु ॲसिडोसिस होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

शीत लहरीच्या काळात मेंढ्यांची लोकर कापणी थांबवावी.

वेळापत्रकानुसार लसीकरण करून घ्यावे.

आवश्यक औषधी व जिवनसत्वे यांचा साठा ठेवावा.

शीत लहरीच्या कालावधीत कुक्कुट पक्ष्यांची घ्यायची काळजी

पक्षी शेड मध्ये दोन्ही बाजूच्या जाळ्यांना पडदे लावून रात्री व पहाटे थंड हवेच्या वेळी बंद करावे. उन्हाच्या वेळी / दुपारी पडदे उघडावेत.

पक्षीगृहात तापमान नियंत्रणाची सोय असावी.

पक्षीघरातील तपमान (२१ ते २३ डि. से.) नियंत्रीत राहणे आवश्यक असते, त्यामुळे शेडमध्ये विजेचे बल्ब, शेगडी किंवा ब्रुडरचा वापर करावा.

हवामानातील बदलामुळे पक्षांवर ताण येवू नये म्हणून त्यांच्या आहारात इलेक्ट्रोलाइटस, जिवन सत्वे, इत्यादींचा वापर करावा.

अति थंडीमुळे हवेतील आर्द्रता वाढून पक्षांची गादी, खाद्य यामध्ये बुरशीची वाढ होवून पक्षांना श्वसनाचे रोग होण्याची दाट शक्यता असते. त्यामुळे पक्षी घरातील गादी स्वच्छ व कोरडी राहील याची खबरदारी घेण्यात यावी.

पक्षांना पिण्यासाठी कोमट पाणी पुरवावे.

उर्जेची गरज वाढल्यामुळे आवश्यकतेनुसार पोषण तज्ञाच्या सल्ल्याने खाद्य तयार करून घ्याचे.

वेळापत्रकानुसार लसीकरण करून घ्यावे.

पुरेसा औषधी, क्षार मिश्रणे व जिवनसत्वे यांचा साठा ठेवावा.

**(संकलन जिल्हा माहिती कार्यालय, सांगली)**

# हिवाळ्यात रोज खा काळे हरभरे, आरोग्याला मिळतील जबरदस्त फायदे



हिवाळ्यात काळे चणे म्हणजेच काळे हरभरे खाणे आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे. हरभरे खाणे तापमानवाढीचा प्रभाव पाडतात, त्यामुळे हिवाळ्यात ते शरीराला उबदार ठेवतात. काळ्या हरभऱ्यामध्ये प्रथिने, जीवनसत्त्वे, लोह, कॅल्शियम, फायबर, पोटॅशियम, मॅग्नेशियम आणि फॉस्फरससह असंख्य पोषक घटक असतात. त्यात अँटीऑक्सिडंट्स देखील भरपूर असतात. हे सर्व घटक निरोगी आणि सक्रिय शरीर राखण्यास मदत करतात.

हिवाळ्यात काळे हरभरे खाणे उच्च रक्तदाबापासून मधुमेहापर्यंतच्या आजारांसाठी फायदेशीर ठरू शकते. काळे चणे वजन कमी करण्यासदेखील मदत करतात आणि पचनाच्या समस्या दूर करण्यास देखील मदत करू शकतात. आज आपण हिवाळ्यात हरभरे खाणे खाण्याचे फायदे जाणून घेऊया.

हिवाळ्यात रोज खा काळे हरभरे, आरोग्याला मिळतील जबरदस्त फायदे

हातापायाचे वॅक्स करण्यासाठी पार्लरला जाताय? आता घरीच बनवा केमिकलफ्री वॅक्सिंग जेल

रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करते-

मधुमेहासाठी काळे चणे म्हणजेच काळे हरभरे खाणे खूप फायदेशीर मानले जाते. त्यात फायबर आणि कार्बोहायड्रेट्स असतात, जे हळूहळू पचतात. यामुळे रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित होण्यास मदत होते. काळे हरभरे खाल्ल्याने शरीरात इन्सुलिनची क्रिया वाढते. ज्यामुळे टाइप २ मधुमेहाचा धोका कमी होतो.

हृदयाच्या आरोग्यासाठी फायदेशीर-

काळे हरभरे निरोगी हृदय राखण्यास देखील मदत करतात. काळे हरभरे पोटॅशियम आणि अँटीऑक्सिडंट्सने समृद्ध असतात. जे रक्तदाब नियंत्रित करण्यास मदत करतात. ते कोलेस्ट्रॉल देखील कमी करते, जे हृदयविकाराचा झटका आणि स्ट्रोक सारख्या आजारांचा धोका कमी करण्यास मदत करते.

अशक्तपणा कमी करते-

काळे हरभरे खाल्ल्याने अशक्तपणा कमी होण्यास मदत होते. काळे हरभरे लोहाने समृद्ध असतात. ते रक्तातील हिमोग्लोबिनची पातळी वाढवते आणि अशक्तपणा दूर करण्यास मदत करते.

वजन कमी करण्यास मदत करते-

वजन कमी करण्यात काळे हरभरे फायदेशीर ठरू शकते. काळ्या चण्यामध्ये जास्त प्रमाणात फायबर असते, जे पचण्यास जास्त वेळ लागतो. यामुळे पोट जास्त काळ भरलेले राहण्यास मदत होते. काळे चणे खाल्ल्याने भूक कमी होते आणि जास्त खाणे टाळता येते. यामुळे वजन कमी होण्यास मदत होते.

हिवाळ्यात कसे खावे काळे हरभरे ?

हिवाळ्यात काळे हरभरे अनेक प्रकारे सेवन करता येते. तुम्ही सकाळी रिकाम्या पोटी भिजवलेले काळे हरभरे खाऊ शकता. तुम्ही उकडलेले काळे हरभरे देखील खाऊ शकता. हिवाळ्यात तुम्ही काळे हरभरे सूप किंवा भाजी करून देखील खाऊ शकता.


प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.



शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८, २४५४०९


## जिल्ह्यातील सर्व गावांचे २०० मीटर परिघीय क्षेत्र 'डीम्ड एनए'



महाराष्ट्र शासनाने सुधारणा केलेल्या कार्यपद्धतीचा अवलंब करीत कोल्हापूर जिल्ह्यातील ३ लाख जमीन मालकांना थेट फायदा होणार आहे. कोल्हापूर जिल्ह्याच्या विकासाला नवी दिशा देणारा आणि सामान्य माणसाच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नाला हात घालणारा एक ऐतिहासिक निर्णय कोल्हापूर जिल्हा प्रशासनाने प्रत्यक्षात आणला आहे. महसूल विभागाच्या धडक मोहिमेअंतर्गत राज्यातील पहिलाच प्रयोग राबवत कोल्हापूर जिल्ह्यातील तब्बल १,२०० गावांमधील ६० हजार गट नंबर (सर्व्हे नंबर) आता 'डीम्ड एनए' (मानीव अकृषिक) म्हणून घोषित करण्यात आले आहेत. सार्वजनिक आरोग्य व कुटुंबकल्याण मंत्री तथा पालकमंत्री कोल्हापूर जिल्हा प्रकाश आबिटकर यांच्या मार्गदर्शनाखाली राबवलेल्या या मोहिमेमुळे ग्रामीण भागातील सुमारे ३ लाख नागरिकांना याचा थेट आणि तत्काळ फायदा मिळणार आहे. या निर्णयामुळे केवळ कागदपत्रांचा प्रवासच थांबला नाही, तर कोल्हापूरच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेला आणि गृहनिर्माण क्षेत्राला मोठी गती मिळणार आहे.

**काय आहे हा ऐतिहासिक निर्णय?**

महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४२ आणि २०२२ च्या शासन परिपत्रकानुसार, गावठाणाच्या हद्दीपासून २०० मीटरच्या परिघीय क्षेत्रातील जमिनी अकृषिक समजल्या जाव्यात, असे स्पष्ट निर्देश होते. मात्र, त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी झाली नव्हती. कोल्हापूर जिल्हा प्रशासनाने पुढाकार घेत महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या जनहितकारी निर्णयाला मूर्त स्वरूप दिले. अवघ्या काही दिवसांत युद्धपातळीवर काम करून प्रशासनाने १,२०० गावांमधील गावठाणालगतच्या जमिनींचे सर्वेक्षण केले. यात रहिवासी, वाणिज्य आणि औद्योगिक वापरास योग्य असलेल्या २०० मीटरच्या परिघातील जमिनी निश्चित करून ६० हजार गट नंबरच्या याद्या तयार केल्या आहेत. या याद्या आता तहसीलदारांकडे सुपूर्द करण्यात आल्या आहेत.

**अर्ज न करता मिळणार सनद**

गावाकडच्या माणसाला घरासाठी किंवा व्यवसायासाठी आपली जमीन 'एनए' (अकृषिक) करायची म्हटले की, सरकारी कार्यालयांत येजा करावी लागत असत. नगररचना विभाग, महसूल विभाग आणि इतर अनेक विभागांचे 'ना हरकत दाखले' मिळवण्यात नागरिकांचा वेळ आणि पैसा वाया जात असे. मात्र, कोल्हापूर पॅटर्नने ही सर्व कटकट संपवली आहे.

आता नागरिकांना जमिनीच्या अकृषिक दर्जासाठी कोणत्याही कार्यालयात अर्ज करण्याची गरज नाही. नगररचना विभागाच्या स्वतंत्र अभिप्रायाची आवश्यकता नाही, की मोजणी शुल्क भरण्याची सक्ती नाही. प्रशासन स्वत:हून आपल्या दारी येणार आहे. तयार करण्यात आलेल्या यादीनुसार तलाठी गावोगावी नोटीस देऊन संबंधित जमीनधारकांना माहिती देतील. त्यानंतर तहसील कार्यालयामार्फत अकृषिक आकाराचे चलन पाठवले जाईल. जमीनधारकाने शासनाचा अकृषिक सारा आणि रूपांतरित कर भरला की, तहसीलदार तत्काळ 'अकृषिक सनद' प्रदान करतील. इतकी सुलभ आणि पारदर्शक प्रक्रिया राबवणारे कोल्हापूर हे राज्यातील पहिले जिल्हा ठरले आहे.

**गावस्तरावर होणारे दूरगामी आणि क्रांतिकारक फायदे**

या निर्णयाचा सर्वाधिक सकारात्मक परिणाम हा गावपातळीवर दिसून येणार आहे. 'डीम्ड एनए'च्या या निर्णयामुळे ग्रामीण भागाचे चित्र कसे पालटणार आहे, हे खालील मुद्द्यांवरून स्पष्ट होते:

**१. घरांचे स्वप्न होणार पूर्ण :** ग्रामीण भागात गावठाणाबाहेर घर बांधताना कायदेशीर अडचणी येत होत्या. आता गावठाणापासून २०० मीटरच्या आतील जमिनी अधिकृतपणे अकृषिक झाल्यामुळे ग्रामस्थांना कायदेशीररीत्या पक्की घरे बांधता येतील. अनधिकृत बांधकामाचा शिक्का पुसला जाईल.

**२. कर्ज मिळणे झाले सोपे :** जोपर्यंत जमिनीला 'एनए'चा दर्जा मिळत नाही, तोपर्यंत बँका आणि वित्तीय संस्था गृहकर्ज किंवा व्यवसायासाठी कर्ज देत नाहीत. आता थेट अकृषिक सनद मिळणार असल्याने बँकांचे दरवाजे शेतकऱ्यांसाठी आणि ग्रामस्थांसाठी खुले होतील. यामुळे गावातच भांडवल उभे राहून विकासाला चालना मिळेल.

**३. बांधकाम व्यवसायाला चालना :** कर्ज उपलब्ध झाल्यामुळे आणि जमिनीची कागदपत्रे क्लियर झाल्यामुळे गावात नवीन बांधकामे सुरू होतील. यातून स्थानिक गवंडी, मजूर, हार्डवेअर विक्रेते आणि सिमेंट-लोखंड व्यापाऱ्यांना मोठा रोजगार मिळेल. एकप्रकारे ग्रामीण अर्थचक्राला यामुळे गती मिळणार आहे.

**४. फसवणुकीला आळा आणि पारदर्शकता :** अनेकदा जमिनीच्या व्यवहारात ती जमीन अकृषिक आहे की नाही, यावरून फसवणुकीचे प्रकार घडत असत. आता प्रशासनानेच अधिकृत याद्या जाहीर केल्यामुळे आणि मालमत्ता पत्रिकेवर तशा नोंदी होणार असल्याने जमिनीचे व्यवहार अत्यंत पारदर्शक होतील. खरेदी-विक्री करताना ग्राहकांची फसवणूक टळेल.

**५. वेळ आणि पैशाची बचत :** पूर्वी एनए ऑर्डर मिळवण्यासाठी एजंटची मध्यस्थी, कार्यालयात हेलपाटे मारणे यात सर्वसामान्यांचे लाखो रुपये खर्च होत. आता 'विना अर्ज' आणि 'विना शुल्क मोजणी' या तत्त्वामुळे शेतकऱ्यांच्या पैशाची मोठी बचत होणार आहे.

**प्रशासकीय गतिमानतेचे उत्तम उदाहरण**

पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी या प्रक्रियेबद्दल समाधान व्यक्त केले आहे. त्यांच्या हस्तेच संबंधित तालुक्यांच्या तहसीलदारांकडे याद्या सुपूर्द करण्यात आल्या आहेत. महसूल विभाग आणि भूमी अभिलेख विभागाने ज्या तत्परतेने हे काम पूर्ण केले, ते वाखाणण्याजोगे आहे. या मोहिमेमुळे कोल्हापूर जिल्ह्याच्या नियोजित विकासाचा मार्ग मोकळा झाला आहे.

थोडक्यात सांगायचे तर, केवळ महसूल गोळा करणे हा या निर्णयाचा उद्देश नसून, सामान्य माणसाला सन्मानाने जगण्याचा हक्क देणे, हा यामागचा मूळ विचार आहे. कोल्हापूरकरांसाठी हा निर्णय खऱ्या अर्थाने आनंद देणारा ठरला असून, येत्या काळात जिल्ह्याच्या ग्रामीण भागात विकासाची नवी गंगा अवतरलेली दिसेल, यात शंका नाही. आता या शासनाच्या निर्णयाची कोल्हापूर जिल्ह्यातील अंमलबजावणी पथदर्शी काम म्हणून राज्यभर स्विकारली जाईल.

**-लेखन -**
**सचिन अडसूळ**

## ०५-औरंगाबाद विभाग पदवीधर मतदार संघ लोकशाही प्रक्रीयेत सहभागासाठी जास्तीत जास्त पदवीधर मतदारांनी नाव नोंदणी करावी - विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर

**छत्रपती संभाजीनगर /प्रतिनिधी :** भारत निवडणूक आयोगाने घोषीत केलेल्या कार्यक्रमानुसार ०५-औरंगाबाद विभाग पदवीधर मतदार संघाची प्रारुप मतदार यादी दिनांक ०३.१२.२०२५ रोजी प्रसिध्दी झालेली आहे. सदर यादीवर दिनांक ०३.१२.२०२५ ते १८.१२.२०२५ या कालावधीत दावे व हरकती स्विकारण्यात येणार आहेत व त्यासाठी मतदान केंद्रनिहाय पदनिर्देशीत अधिकारी नियुक्त करण्यात आलेले आहेत. नियुक्त अधिकारी यांना दावे व हरकती स्वीकारण्याच्या कालावधीत कार्यालयीन वेळेत सदर मतदान केंद्राच्या ठिकाणी उपस्थित राहून अर्ज स्विकारण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. दिनांक ०६.११.२०२५ ते ०२.१२.२०२५ या कालावधीत ऑनलाईन व ऑफलाईन जे अर्ज प्राप्त झालेले आहेत ते सर्व अर्ज आता दावे व हरकती स्विकारण्याच्या कालावधीत डाटाएन्ट्री करुन निकाली काढण्यात येणार आहेत.

महिला मतदारांकडे नावातील बदलाच्या संदर्भात आवश्यक कागदपत्रांची पडताळणी व आवश्यकतेनुसार गृहचौकशी करुन नियमानुसार कार्यवाही करण्यात येणार आहे. प्रारुप मतदार यादीच्या तपासणी मध्ये आढळून आलेल्या त्रुटी तपासून या त्रुटींची नियमानुसार तात्काळ दुरुस्ती करण्याच्या सूचना सर्व सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी यांना देण्यात आलेल्या आहेत.

मतदार नोंदणी ही निरंतर चालणारी प्रक्रिया असल्याने नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत सुरु असते. अर्ज दाखल करण्याकरीता ऑनलाईन व ऑफलाईन या दोन्ही पध्दती चालु रहाणार असून मतदार नोंदणीचा ऑफलाईन अर्ज स्वीकारण्यास कोणीही नकार देवू नये, असे निर्देश क्षेत्रीय स्तरावरील सर्व सहायक मतदार नोंदणी अधिकारी यांना देण्यात आलेले आहेत.

लोकशाही प्रक्रीयेत सहभाग नोंदवून जास्तीत जास्त नाव नोंदणी करावी, असे आवाहन मतदार नोंदणी अधिकारी तथा विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी केले आहे.

## आयुक्तांच्या खोट्या स्वाक्षरीने नियुक्तीपत्र मनपाकडून नागरिकांना सावधानतेचा इशारा

**लातूर/प्रतिनिधी :** मनपा आयुक्तांच्या खोट्या स्वाक्षऱ्या करुन लिपिक पदावर नियुक्तीपत्र दिल्याचे उघड झाल्यानंतर पालिकेकडून पोलिसांना कारवाईसाठी कळविण्यात आले आहे.नागरिकांनीही सावध रहावे, असा इशाराही देण्यात आला आहे.

लातूर शहरातील शुभम बाळासाहेब गरड, श्रीमती ज्ञानेश्वरी रवी गरड, मारुती भगवान शिवणे, आदित्य बंकट भिंगे,सोमनाथ लक्ष्मण पांचाळ, बापूराव धोंडीराम हुडे यांनी आपली लिपिक पदावर नियुक्ती झाल्याचे आदेश जोडून ते आदेश अधिकृत आहेत काय? या संदर्भात माहिती मागवली होती. मनपाला याबाबत पत्र प्राप्त झाल्यानंतर त्याची शहानिशा करण्यात आली.त्यावेळी या प्रकारात मनपाचा काहीही संबंध नाही.हे नियुक्तीपत्र मनपातून देण्यात आलेले नाही.कोणीही अधिकारी किंवा कर्मचारी यात सहभागी नाही.नियुक्ती पत्र खोटे असून आयुक्तांच्या बनावट स्वाक्षऱ्या केल्याचे निदर्शनास आले.यानंतर आयुक्तांनी आदेश देऊन संबंधितांवर चौकशी करून गुन्हा दाखल करण्यासाठी शिवाजीनगर पोलिसांना कळविण्यात आले आहे.

शहरातील नागरिकांनी सावध राहून अशा प्रकारे आपली फसवणूक होणार नाही याची काळजी घ्यावी, असे आवाहन मनपाच्या वतीने करण्यात आले आहे.

## जन्मदात्या आईनेच विकले सहा चिमुरडे

**नाशिक/प्रतिनिधी :** त्र्यंबकेश्वर तालुक्यातील टाके देवगाव (बरड्याची वाडी) येथील एका महिलेने आपल्या पोटच्या सहा मुला-मुलींची केवळ पैशासाठी विक्री केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. हलाकीच्या परिस्थितीमुळे तिने हा निर्णय घेतल्याचे सांगितले जात आहे.

आर्थिक गरज मनुष्याला काय करण्यास भाग पाडेल याचा अंदाज बांधता येत नाही. घरातील बिकट आर्थिक स्थितीमुळे असे कृत्य घडल्याचे उदाहरण या घटनेतून समोर आले आहे. तब्बल १४ अपत्यांना जन्म देणाऱ्या ४५ वर्षीय महिलेने फक्त १० हजार रुपये मिळवण्यासाठी एका बाळाची विक्री केली असल्याची माहिती मिळाली आहे. अशा प्रकारे एकूण सहा बालकांची विक्री केल्याचेही उघड झाले आहे.

या परिसरात अशाप्रकारच्या आणखी काही घटना झाल्याची शक्यता वर्तवली जात असून, या प्रकारामुळे सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. पुढील काळात अशा घटना घडू नयेत यासाठी समाजातील सर्व घटकांनी

# विद्यार्थी विद्यार्थिनींसाठी प्रत्येक जिल्ह्यात वस्तीग्रहांची त्वरीत उभारणी करावी, जेथे वस्तीगृह नाही तेथील पात्र विद्यार्थी विद्यार्थिनींना निवास व भोजन भत्ता देण्यात यावा

## अमित विलासराव देशमुख यांची विधानसभेत मागणी

**नागपूर/प्रतिनिधी :** ओबीसी राज्याचे माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांनी आज विधानसभेत राज्यातील इतर मागासवर्गीय (ओबीसी) विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी शासकीय वसतिगृह उभारणीचे उद्दिष्ट अपूर्ण राहिल्याबद्दल तारांकित प्रश्न उपस्थित केला. प्रत्येक जिल्ह्यात २०० विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह उभारणीचे उद्दिष्ट असताना ते किती साध्य झाले, असा प्रश्न त्यांनी विचारला. यावर सामाजिक न्याय व विशेष साहाय्य मंत्री श्री. अतुल सावे यांनी, वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या ३६ जिल्ह्यातील २१,६०० पात्र ओबीसी विद्यार्थी-विद्यार्थिनींना त्यांच्या बँक खात्यात थेट निवास व भोजन खर्च भत्ता वाटप करण्यात येत असल्याची माहिती दिली. तसेच, आमदार देशमुखयांच्या मागणीनुसार लवकरच वसतिगृह उभारणीचे आश्वासनही त्यांनी दिले.

राज्याचे माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांनी आज (मंगळवार) विधानसभेत नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात राज्यातील इतर मागासवर्गीय (ओबीसी) विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी शासकीय वसतिगृह उभारणीच्या अपूर्ण उद्दिष्टावर तारांकित प्रश्न उपस्थित केला. आमदार अमित देशमुख यांनी प्रश्न विचारला की, महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात १०० विद्यार्थी आणि १०० विद्यार्थिनींसाठी (एकूण २०० विद्यार्थी) शासकीय वसतिगृह उभारणीचे उद्दिष्ट असताना, आत्तापर्यंत हे उद्दिष्ट किती प्रमाणात साध्य झाले आहे? या उद्दिष्ट पूर्तीसाठी जेथे वस्तीगृहांचे बांधकाम झालेले नाही, तेथील पात्र विद्यार्थी आणि विद्यार्थिनींना निवास व भोजन खर्च भत्ता देण्यात यावा, अशी आग्रही मागणीही त्यांनी तारांकित प्रश्नावरील चर्चेत सहभागी होताना केली.

आमदार देशमुख यांच्या उपप्रश्नाला उत्तर देताना सामाजिक न्याय व विशेष साहाय्य मंत्री श्री. अतुल सावे यांनी खालील माहिती दिली की,

निवास भत्ता प्रत्येक जिल्ह्यातील ६०० प्रमाणे ३६ जिल्ह्यातील एकूण २१,६०० विद्यार्थी विद्यार्थिनींना त्यांच्या आधार कार्डच्या आधारे त्यांच्या बँक खात्यात निवास आणि भोजन खर्च भत्ता वाटप करण्यात येत आहे. तसेच सन २०२४-२५ या वर्षात, २,८८९




विद्यार्थी विद्यार्थिनींना शासनाने या योजनेत सामावून घेतले. चालू वर्षात १,२०० विद्यार्थी विद्यार्थिनींची सोय वसतिगृहात करण्यात आली आहे. असे सांगून मंत्री सावे यांनी लवकरात लवकर प्रत्येक जिल्ह्यात वस्तीगृहाची उभारणी करून या विद्यार्थी विद्यार्थिनींना निवास, भोजन, ग्रंथालय, अभ्यासिका या सोयी-सुविधा पुरवल्या जातील, असे आश्वासन दिले.

# निवडणूकीच्या अनुषंगाने मनपा ॲक्शन मोडवर स्टाँग रुमसह विविध ठिकाणी आयुक्तांनी केली पाहणी

**लातूर/प्रतिनिधी :** आगामी काही दिवसात होणाऱ्या महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालय,मतमोजणी, तसेच स्ट्राँग रूमसाठी जागा आवश्यक आहे. त्याअनुषंगाने मनपा आयुक्त श्रीमती मानसी यांनी बुधवारी (दि. १०) स्थळ पाहणी केली.

आगामी महानगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगाने महानगरपालिका प्रशासन तयारी करत आहे. मतदानानंतर मतमोजणी पर्यंत काही दिवस



मतपेट्या संरक्षित ठिकाणी ठेवाव्या लागतात.तसेच त्यानंतर मतमोजणीसाठीही सुरक्षित स्थळ आवश्यक असते. त्याअनुषंगाने आयुक्तांनी पाहणी करून चाचपणी केली.

मतमोजणी व स्ट्राँग रूमसाठी बार्शी रस्त्यावरील महिला तंत्रनिकेतन तसेच औसा रस्त्यावरील पुरणमल लाहोटी शासकीय तंत्रनिकेतनच्या इमारतींची पाहणी आयुक्तांनी केली. मतमोजणीसाठी आवश्यक असणा-या बाबी/ सोयी-सुविधाची पाहणी केली. या ठिकाणी अधिकच्या कोणत्या सोयी कराव्या लागतील याची माहितीही आयुक्तांनी घेतली.

निवडणुकीत निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांसाठी स्वतंत्र कार्यालय आवश्यक आहे. त्यासाठी बार्शी रस्त्यावर महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालय तसेच बाजार समिती परिसरातील समाज कल्याण कार्यालय या ठिकाणांची पाहणीही आयुक्त श्रीमती मानसी यांनी केली.

याप्रसंगी मनपा उपायुक्त डॉ.पंजाबराव खानसोळे,शहर अभियंता उषा काकडे, कार्यकारी अभियंता विजय चव्हाण, अग्निशमन अधिकारी गणेश चौधरी, प्रवीण इंगळे,निवडणूक विभाग प्रमुख परमेश्वर होके यांच्यासह सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

## बेशिस्त वाहनचालकांवर आरटीओची कारवाई

**ठाणे/प्रतिनिधी :** ठाणे शहरातील वाढती वाहतूक कोंडी, नियमभंग आणि बेशिस्त वाहनचालकांमुळे नागरिकांचे हाल होत असतानाच, नामदार प्रताप सरनाईक यांच्या सूचनेवरून, ठाणे प्रादेशिक परिवहन कार्यालयाने (आरटीओ) कडक पावले उचलत घोडबंदर रोडसह महत्त्वाच्या म ार्गांवर बेशिस्त वाहनचालकांवर धडक कारवाई सुरू करण्याचे आदेश जारी केले आहेत. येत्या काही दिवसांत नियमभंग करणाऱ्या वाहनचालकांसाठी मोठी मोहीमही राबवली जाणार आहे.

प्रादेशिक परिवहन अधिकारी हेमांगिनी पाटील यांच्या आदेशानुसार वायुदत पथक क्रमांक १ ते ५, तसेच १० मोटार वाहन निरीक्षकांना तातडीने कारवाईचे निर्देश देण्यात आले आहेत.

# सोलिसकडून किसान पुणे २०२५ मध्ये प्रगत आणि सर्वात शक्तिशाली ट्रॅक्टर्सचे प्रदर्शन, ज्यामध्ये नेक्स्ट जेन प्लॅटफॉर्मवरील जेपी ९७५, सोलिस २७१६ एसएन आणि वायएम २३५ यांचा समावेश

## विशेषत: प्रत्येक विकसित किसानसाठी डिझाइन करण्यात आलेल्या कंपनीच्या श्रेणीमध्ये विविध कार्यसंचालनांमध्ये सर्वोत्तम कार्यक्षमतेसाठी शक्तिशाली सोलिस ५७२४ ४ डब्ल्यूडी आणि वायएम ३४८ आर ट्रॅक्टर्सचा देखील समावेश आहे

**पुणे/प्रतिनिधी :** सोलिस या इंटरनॅशनल ट्रॅक्टर्स लिमिटेड (आयटीएल) च्या प्रमुख ब्रँडने महाराष्ट्रातील पुणे येथे किसान ॲग्री शो २०२५ मध्ये सर्वात शक्तिशाली मल्टीस्पीड ट्रॅक्टर्सच्या नाविन्यपूर्ण व व्यापक श्रेणीला दाखवले आहे. यामध्ये नुकतेच लाँच करण्यात आलेल्या सोलिस जेपी ९७५ ट्रॅक्टरचा समावेश आहे, जो पूर्णपणे नेक्स्ट जनरेशन प्लॅटफॉर्मवर डिझाइन करण्यात आला आहे, तसेच सॉलिस २७१६ एसएन आणि यानमार वायएम २३५ अशा नेक्स्ट-जनरेशन मॉडेल्सचा समावेश आहे, जे शेतक-यांना अधिक आऊटपुट देण्यासाठी डिझाइन करण्यात आले आहेत. या नवीन मॉडेल्सना पूरक म्हणून कंपनीच्या श्रेणीमध्ये सोलिस ५७२४ ४ डब्ल्यूडी आणि वायएम ३४८ आर देखील आहेत, जे विशेषत: प्रत्येक विकसित किसानला सर्वोत्तम आरामदायीपणा आणि उच्च ऑपरेशन कार्यक्षमता देण्यासाठी डिझाइन करण्यात आले आहेत.

सोलिस जेपी ९७५ २डब्ल्यूडी/४डब्ल्यूडी पूर्णपणे नवीन




प्लॅटफॉर्मवर डिझाइन करण्यात आला आहे, ज्यामध्ये जेपी टेक ४-सिलिंडर इंजिन, भारतातील सेगमेंटमधील पहिले १५एफ + १५आर इपिसायकलिक ट्रान्समिशन, साइड-शिफ्ट गिअर्स आणि सर्वोत्तम कृषी अनुभवासाठी किमान ५ सानुकूल वर्किंग स्पीड्स आहेत. ऑर्चर्ड एक्स्पर्ट सोलिस २७१६ एसएन मध्ये जगातील सर्वोत्तम इंजिन, सर्वोच्च पीटीओ पॉवर, साइड शिफ्ट गिअर, ३ फीट पर्याय, १२एफ+४आर ट्रान्समिशन आहे, तर फार्मिंग एक्स्पर्ट वायएम २३५ मध्ये सानमारचे प्रगत शक्तिशाली इंजिन, प्रोजेक्टर हेड लॅम्प, प्रमाणित आरओपी, पॉवर शटलसह दर्जात्मक ग्राऊड क्लीअरन्सची खात्री देणारे १६ स्पीड पर्याय, किमान टर्निंग रेडियस, उत्तम नियंत्रण आणि सर्व कृषी क्रियाकलापांसाठी वैविध्यता आहे. किसान पुणे शोमधील कंपनीच्या स्टॉल क्रमांक ओडी-०३ मध्ये कंपनीने यानमार वायएम ३४८आरसह मोठे 14.9x28 आकाराचे रिअल टायर देखील प्रदर्शित केले आहे.

याप्रसंगी मत व्यक्त करत सोलिस यानमारचे अध्यक्ष श्री. मुदित गुप्ता म्हणाले, आम्हाला महाराष्ट्रातील शेतक-यांच्या प्रगतीसाठी आमच्या ट्रॅक्टर्सची शक्तिशाली श्रेणी सादर करण्याचा अत्यंत अभिमान वाटतो, ज्यामध्ये सोलिस जेपी ९७५ २डब्ल्यूडी/४डब्ल्यूडी, सोलिस २७१६ एसएन आणि वायएम २३५ यासारख्या नवीन मॉडेल्सचा देखील समावेश आहे. आमच्या सोलिस जेपी ९७५ च्या लाँचसह आम्ही शेतक-यांसाठी कृषीच्या नवीन पद्धतीला आणत आहोत, जेथे आम्ही शेतक-यांची उत्पादकता वाढवण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानासह पूर्णपणे नवीन जेन प्लॅटफॉर्मचा समावेश केला आहे. तसेच, आमचे ऑर्चर्ड एक्स्पर्ट सोलिस २७१६ एसएन आणि फार्मिंग एक्स्पर्ट वायएम २३५ राज्यामधील विकसित किसानच्या विविध गरजांची पूर्तता करण्यासाठी अपवादात्मक वैविध्यता देतात. सोलिसमध्ये आम्ही कार्यसंचालनादरम्यान आरामदायीपणा व उत्पन्न वाढवणाऱ्या आणि नवीन तंत्रज्ञान असलेल्या नाविन्यपूर्ण ट्रॅक्टर्ससह शेतक-यांचा अनुभव अधिक उत्साहित करण्याप्रती कटिबद्ध आहोत.

संचालक यानमार इवामो सॅन, विभाग प्रमुख महेश इथापे आणि महाराष्ट्रातील डिलर सहयोगी व शेतक-यांनी उपस्थिती दाखवून या कार्यक्रमाची शोभा वाढवली. किसान ॲग्री शो २०२५ प्रदर्शन कृषी ब्रँड्स, उद्योगामधील भागधारक, शेतकरी आणि कृषीप्रेमींसाठी कृषीच्या विकासाकरिता एकमेकांशी संलग्न होण्याचे केंद्र आहे. पुणे इंटरनॅशनल एक्झिबिशन अँड कन्वेंशन सेंटर (पीआयईसीसी), मोशी, भोसरीजवळ, पुणे, महाराष्ट्र येथे १० ते १४ डिसेंबर २०२५ पर्यंत या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे.

# कलबुरगि-बेंगळुरू वंदे भारत एक्स्प्रेस नवीन स्टॉपपेज श्री सत्य साई प्रशांति निलयम मार्गे सुधारित वेळेसह धावेल


**सोलापूर/प्रतिनिधी :**भारतीय रेल्वेने ट्रेन क्रमांक २२२३१/२२२३२ कलबुरगि-एसएमवीटी बेंगळुरू वंदे भारत एक्स्प्रेस श्री सत्य साई प्रशांती निलयम मार्गे रवाना केली आहे आणि श्री सत्य साई प्रशांति निलयम येथे १ जानेवारी २०२६ पासून कलबुरगि व २ जानेवारी २०२६ पासून एसएमवीटी बेंगळुरू मधून अतिरिक्त थांबा सुरू केला आहे. यात्रेकरू, भाविक आणि या प्रदेशात ये-जा करणा-या प्रवाशांना फायदा होण्यासाठी आता ही ट्रेन या मार्गावरून धावणार आहे.

तपशील खालीलप्रमाणे:-

गाडी क्रमांक २२२३१/२२२३२ कलबुरगि-एसएमवीटी बेंगळुरू वंदे भारत एक्स्प्रेसच्या सुधारित वेळा

ट्रेन क्रमांक २२२३१ कलबुरगि-एसएमवीटी बेंगळुरू वंदे भारत एक्सप्रेस (आगमन/प्रस्थान)

* कलबुरगि (प्रस्थान) - आधीच्या पहाटे ०५:१५ ऐवजी सकाळी ०६:१० तास वाजता सुटेल.
* यादगीर - सकाळी ०६:४८/०६:५० तास
* रायचूर - ०७:३८/०७:४० तास
* मंत्रालयम रोड - ०७:५८/०८:०० वा




* गुंटकल - ०९:००/०९:०५ तास
* अनंतपूर - १०:०३/१०:०५ तास
* श्री सत्य साई प्रशांति निलयम (नवीन जोडलेला थांबा) - ११:००/११:०२ तास.
* येलहंका - दुपारी १२:२८/१२:३० तास
* सर एम. विश्वेश्वरय्या टर्मिनल बेंगळुरू (आगमन) - दुपारी ०२:१० तास.

ट्रेन क्रमांक २२२३२ एसएमवीटी बेंगळुरू-कलबुरगि वंदे भारत एक्सप्रेस (आगमन/प्रस्थान)

* सर एम. विश्वेश्वरय्या टर्मिनल बेंगळुरू (प्रस्थान) - दुपारी ०२:४० तास
* येलाहंका - दुपारी ०३:०५/०३:०७ तास
* श्री सत्य साई प्रशांति निलयम (नवीन जोडलेले थांबे) - दुपारी ०४:२३/०४:२५ तास
* अनंतपूर - ०५:३३/०५:३५ तास
* गुंटकल - ०६:३७/०६:४२ तास
* मंत्रालयम रोड - ०७:४८/०७:५० तास
* रायचूर - ०८:१८/०८:२० तास
* यादगीर - ०९:०३/०९:०५ तास
* कलबुरगि (आगमन) - १०:४५ तास, मागील ११:३० तासांच्या वेळापत्रकापेक्षा आधी पोहोचेल.

मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने प्रवाशांना विनंती केली आहे की त्यांनी त्यांच्या प्रवासाचे नियोजन करताना या सुधारित वेळेची नोंद घ्यावी.

# मुक्तांगण इंग्लिश स्कूलमध्ये पालकांच्या डिश डेकोरेशन आणि रांगोळी स्पर्धा

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर येथील विशाल नगर परिसरातील, साईमंदिर समोरील मातोश्री कलावती प्रतिष्ठान संचालित मुक्तांगण इंग्लिश स्कूलमध्ये पालकांच्या करिता डिश डेकोरेशन आणि रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाचे उद्घाटन प्रमुख पाहुणे कविता लाटे व शाळेच्या प्राचार्या सुमेरा शेख यांच्या हस्ते दिप प्रज्वलन करून करण्यात आले. याप्रसंगी पालक, शिक्षिका व विद्यार्थी उपस्थित होते.

शाळेच्या पालकांनी तयार केलेल्या डिशेस प्रदर्शनात सादर करण्यात आल्या. पालकांनी सादर केलेले डिश डेकोरेशन हे आपल्या संस्कृतीशी निगडीत होते. मुलांना कशा प्रकारे खावयाच्या पदार्थात आवड निर्माण करता येईल या उद्देशाने पालकांनी नव-नवीन पदार्थ तयार करून दाखवले. प्रमुख पाहुण्यांनी डिश डेकोरेशनमध्ये



सादर केलेल्या वेगवेगळ्या खाद्यपदार्थांची माहिती सहभागी पालकांकडून घेतली.

सदर कार्यक्रमाचे परीक्षक कविता लाटे यांनी खाद्यपदार्थांचे परीक्षण करून प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक निवडला. यामध्ये विद्यार्थ्यांच्या पालकामधून प्रथम क्रमांक प्रियांका सतलिंग बुलबुले, ज्योती विजयकुमार चिंचोलकर, पूनम छगन बन

द्वितीय क्रमांक दीक्षा धनंजय देलमाडे, वर्षा शेखर कोरे तृतीय क्रमांक सोनाली गोपाल खटावकर, रोहिणी नितीन बचाटे, वैष्णवी गिरीश गर्जे, ज्योती विशाल महालकर, तृप्ती श्रीनिवास नाईकनवरे यांना देण्यात आला.

या स्पर्धेनंतर रांगोळी स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेमध्ये पालकांनी सहभाग नोंदवला. या स्पर्धेमधील सर्व रांगोळीचे निरीक्षण करून प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक निवडण्यात आले. विद्यार्थ्यांच्या पालकामधून प्रथम क्रमांक तृप्ती श्रीनिवास नाईकनवरे , द्वितीय क्रमांक ज्योती विजयकुमार चिंचोलकर

तृतीय क्रमांक वैष्णवी गिरीश गर्जे, सोनाली गोपाल खटावकर यांना देण्यात आला.

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन शाळेच्या शिक्षिका सुवर्णा माळवदकर यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेच्या शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम अंतर्गत २४ बालकांवर होणार हृदयरोग विषयक उपचार

## - जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा पालकांशी संवाद
## - पुणे येथील विविध रुग्णालयांमध्ये होणार उपचार

**लातूर/प्रतिनिधी :** राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत सन २०२५-२६ मध्ये जिल्ह्यातील अंगणवाडी आणि शासकीय, निमशासकीय शाळांमधील ० ते १८ वर्षे वयोगटातील बालकांची व विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात आली. यामध्ये हृद्यदोष आढळलेल्या २४ बालकांवर पुणे येथील विविध नामांकित रुग्णालयांमध्ये मोफत शस्त्रक्रिया केली जाणार असून यासाठी ही बालके रवाना झाली. यानिमित्ताने जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात त्यांच्या पालकांशी संवाद साधला.

आरोग्य उपसंचालक डॉ. रेखा गायकवाड, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. प्रदीप ढेले, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. अशोक सारडा, डॉ. आनंद कलमे तसेच राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम अंतर्गत ० ते ६ वर्षे वयोगटातील बालकांची वर्षातून दोन वेळा आणि ६ ते १८ वर्षे वयोगटातील बालकांची वर्षातून एक वेळा आरोग्य तपासणी केली जाते. यासाठी जिल्ह्यात ३० पथकांची तपासणी करण्यात आली आहे. बालकांमध्ये आढळणारे जन्मतः असलेले व्यंग, लहान मुलांमधील आजार, जीवनसत्वाच्या कमतरतेमुळे होणारे आजार व दिव्यांगत्व याचे वेळीच निदान व उपचार होण्यासाठी राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम उपयुक्त ठरत आहे. सन २०२५-२६ या वर्षात जिल्ह्यातील एकूण १ हजार २९९ बालकांमध्ये दृष्टीदोष, ४ हजार ६०१ बालकांमध्ये दातांचा आजार आढळून आला आहे. त्यांना पुढील उपचारासाठी संदर्भित करण्यात आले आहे. तसेच या वर्षात ४७ बालकांवर तिरळेपणावरील शस्त्रक्रिया करण्यात आली आहे.

सन २०२५-२६ मध्ये जिल्ह्यातील संशयित हृद्यदोष आढळलेल्या २२४ बालकांची टू-डी एको तपासणी करण्यात आली. तसेच ५६ बालकांवर मोफत शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. आणखी २४ बालके शस्त्रक्रियेसाठी रवाना झाली आहेत. पुणे येथील रुबी हॉल, ग्लोबल हॉस्पिटल, इनलॅक्स हॉस्पिटल येथे या बालकांवर आवश्यक शस्त्रक्रिया होणार आहेत.

राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम अंतर्गत आरोग्य तपासणीमुळे बालकांमधील आजाराचे लवकर निदान व उपचार होणे शक्य होत आहे. हृद्यदोष असलेल्या बालकांवर मोफत उपचार करण्यात येत असल्याने ग्रामीण भागातील पालकांना दिलासा मिळत आहे. जिल्ह्यात राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम अधिक व्यापक स्वरुपात राबविण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी यावेळी सांगितले.

### दयानंद विज्ञान महाविद्यालयात दहा दिवसीय कृत्रिम बुद्धिमत्ता व सायबर सुरक्षा कौशल्य विकास कार्यशाळेचे उद्घाटन

**लातूर/प्रतिनिधी :** येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित,दयानंद विज्ञान महाविद्यालयातील करिअर आणि प्लेसमेंट सेल व इंटरनॅशनल बिजनेस मशीन आणि मॅजिक बस इंडिया फाऊंडेशन,पुणे यांच्या वतीने दि.०९ ते १९ डिसेंबर २०२५ या दरम्यान युवा सक्षमीकरणासाठी आयोजित करण्यात आलेल्या कृत्रिम बुद्धिमत्ता व सायबर सुरक्षा कौशल्य विकास कार्यशाळेचे उद्धाटन झाले.याप्रसंगी कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी दयानंद शिक्षण संस्थेचे शैक्षणिक विकास अधिकारी डॉ.जयप्रकाश दरगड,महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे,प्रमुख पाहुणे एआय ट्रेनर रतन वर्मा प्रोफाईल ऑफिसर अक्षय पोटभरे,करण धायगुडे, टीपीओ अनिल बिराजदार,कार्यशाळा संयोजक डॉ.महेश करळे,सहसंयोजक डॉ.रोहिणी शिंदे,डॉ.संगीता जाजू यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे असे म्हणाले की,युवा सक्षमीकरणासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता व सायबर सुरक्षा कौशल्य विकास अत्यंत महत्त्वाची बाब आहे.म्हणूनच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सदरील कौशल्य विकास आधारित कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.या कार्यशाळेतील ज्ञानाचा विद्यार्थ्यांनी जास्तीत-जास्त फायदा घ्यावा.भविष्यकाळात विद्यार्थ्यांना नोकरीसाठी योग्य दिशा मिळेल,त्याचा निश्चितच फायदा होईल. अध्यक्षीय समारोप करताना संस्थेचे एडिओ डॉ. जयप्रकाश दरगड असे म्हणाले की,स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांमध्ये कौशल्य विकास वाढणे ही आधुनिक काळाची खरी गरज आहे.विद्यार्थ्यांमध्ये नैपुण्यता आणणे यासाठी सातत्याने संस्थेमार्फत कॅम्पस ड्राईव्हचे आयोजन केले जाते.अशा कार्यशाळेमुळेच संस्थेचा जॉब ड्राईव्ह निश्चितच वाढेल.तसेच विद्यार्थ्यांना तांत्रिक शिक्षण,कृत्रिम बुद्धिमत्ता,सायबर सुरक्षा यांचे ज्ञान मिळण्याबरोबर त्यांच्यामधील सॉफ्ट स्किल वाढणे हेही अत्यंत महत्त्वाचे आहे.अशा या कार्यशाळेमधूनच विद्यार्थी घडतात.विद्यार्थ्यांनी अशा कार्यशाळेचा लाभ घ्यावा असे त्यांनी आवाहन केले.

### मुक्त विद्यापीठात शनिवार 13 डिसेंबरला उर्दू कवितांविषयी एक दिवसीय परिसंवाद आयोजित

**नाशिक/प्रतिनिधी :** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात येत्या शनिवार दिनांक १३ डिसेंबर रोजी '२१ व्या शतकातील उर्दू नज्म' (कविता) या विषयी एक दिवसीय परिसंवाद आयोजित करण्यात आला आहे. साहित्य अकादमी (संस्कृती मंत्रालय, नवी दिल्ली) व विद्यापीठातील मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा यांच्या संयुक्त विद्यमाने हा परिसंवाद होईल. या परिसंवादाचे उद्घाटन विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या हस्ते तर प्रमुख भाषण प्रसिद्ध उर्दू विद्वान आणि पत्रकार डॉ. मेहताब आलम (भोपाळ) यांचे होईल. विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्रा. जोगेंद्रसिंह बिसेन, साहित्य अकादमीचे संपादक श्री. अनुपम तिवारी यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

# लातूर शहरात राबवली जाणार को ब्रॅंडेड आयुष्यमान कार्ड निर्मिती मोहीम

**लातूर/प्रतिनिधी :**आरोग्य संरक्षण अधिक प्रभावी व सुकर करण्याच्या उद्देशाने राज्य सरकारने आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना यांचे को ब्रॅंडेड कार्ड निर्माण करणे संदर्भात मार्गदर्शक सूचना निर्गमित केले आहेत.

त्या अनुषंगाने दिनांक ९ डिसेंबर २०२५ ते ३० डिसेंबर २०२५ दरम्यान लातूर शहरांमध्ये आयुष्मान कार्ड निर्मिती करण्यासाठी विशेष मोहीम राबवली जात आहे. लातूर शहर महानगरपालिकेतील आरोग्य केंद्र, सीएससी सेंटर तसेच रास्त भाव दुकान या ठिकाणी केवायसी केली जाणार आहे. तसेच लागलीच आयुष्मान कार्डची निर्मिती देखील केली जाणार आहे.

**लाभार्थी कोण आहेत**

या योजनेचा लाभ लातूर शहरातील सर्व नागरिकांना घेता येतो. यामध्ये प्रामुख्याने प्रतिक कुटुंब प्रति वर्ष रुपये पाच लाखापर्यंत मोफत शस्त्रक्रिया व उपचार हे २३९९ आजारांवरती शहरातील खाजगी व शासकीय असे एकूण ३६ रुग्णालयामध्ये उपचार घेता येऊ शकतात.

**स्वत:ही करता येईल ई केवायसी**

अँड्रॉइड मोबाईल मध्ये आयुष्मान ॲप डाऊनलोड करून ॲप मधील बेनिफिशियरी बटन वर क्लिक करून लाभार्थी स्वत:चे ई केवायसी कार्ड काढू शकतात याशिवाय आपल्या नजीकच्या आरोग्य केंद्रामध्ये अशा स्वयंसेविका मार्फत, आरोग्य कर्मचारी यांचेमार्फत तसेच रास्त भाव दुकान, सीएससी सेंटर येथे देखील इ केवायसी करून कार्ड काढून घेता येते.

**राष्ट्रीय स्तरावरील ओळखपत्र**

या कार्डमुळे देशभरातील अधिकृत रुग्णालयांमध्ये उपचार घेणे लाभार्थ्यांना शक्य होणार आहे. महाराष्ट्रातील सरकारी व मान्यता प्राप्त खाजगी रुग्णालयांमध्ये देखील याचा लाभ मिळणार आहे.

**आरोग्य कवचाचे स्वरूप**

दरवर्षी प्रती कुटुंब पाच लाखांपर्यंतचे कॅशलेस आरोग्य कवच या कार्डच्या आधारावर मिळते. यात शस्त्रक्रिया दाखल करून उपचार, आपातकालीन सेवा यांचा समावेश आहे.

**आयुष्मान कार्ड तयार करण्यासाठी लागणारी आवश्यक कागदपत्रे**



रेशन कार्ड ऑनलाइन केलेले तसेच आधार कार्ड केवायसी केलेले असणे गरजेचे आहे

**शासकीय कर्मचाऱ्यांनाही लाभ**

शहरातील सर्व पात्र नागरिकांना या योजंनेचा लाभ घेता येतो शासकीय कर्मचारी आणि त्यांचे कुटुंबीय देखील या आरोग्य योजनेचा लाभ घेऊ शकतात.

शहरातील नागरिकांनी या योजनेचा लाभ घेऊन आरोग्य विभागामार्फत तसेच सीएससी रास्त भाव दुकानदार यांना आयुष्यमान कार्ड निर्मिती करणे कामी सहकार्य करावे. असे आवाहन लातूर शहर महानगरपालिकेच्या आयुक्त श्रीमती मानसी व उपायुक्त श्रीमती वसुधा फड यांनी केले आहे.

### यशवंत विद्यालयामध्ये व्यसनमुक्ती, सायबर सुरक्षेसाठी पोलिस-विद्यार्थी संवाद

**अहमदपूर/प्रतिनिधी :** अहमदपूर येथील यशवंत विद्यालयामध्ये विद्यार्थ्यांमध्ये वाढती व्यसनाधीनता आणि सायबर गुन्ह्यांबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी पोलीस-विद्यार्थी संवाद या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये कायद्यांबद्दल आदर आणि सुरक्षेची भावना अधिक दृढ झाली.

या कार्यक्रमाला उपविभागीय पोलिस अधिकारी अरविंद रायबोले, पोलिस निरीक्षक विनोद मेत्रेवार उपस्थित होते. यावेळी उपविभागीय पोलिस अधिकारी अरविंद रायबोले यांनी प्रोजेक्टरच्या सहाय्याने मद्य, तंबाखू, गुटखा, सिगारेट आणि ड्रग्ज यांचे शारीरिक, मानसिक व शैक्षणिक दुष्परिणाम विद्यार्थ्यांना समजावून सांगितले.

यासोबतच त्यांनी सायबर क्राईम, पोक्सो कायदा, वाहतूक नियम, ऑनलाइन फसवणूक आणि बालसुरक्षा कायदे यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. मुख्याध्यापक गजानन शिंदे यांनी विद्यार्थ्यांच्या दफ्तराची तपासणी करून अनुचित वस्तूंवर लक्ष ठेवले जाईल, असे सांगितले.

### अधिकार ..

माहितीचा अधिकार
न्याय रूपात सुविधा
सत्य कथन करतात
असता शंका दुविधा

सशक्तप्रशासनास्तव
सक्षममदती कायदा
स्पटिकासम सत्यता
करतोनक्की वायदा

सामान्य नागरिकांस
अद्भुत अमोलसंपदा
गुड गव्हर्नन्स संबधि
जणूही खुलीनिविदा

नियमांच्या चौकटीत
करतो माहिती वादा
प्रक्रिया संपूर्ण करुन
सादर करतो मसुदा

अधिकार जाणायचा
किंमत मोठी कागदा
प्रस्तुत होईलं सगळे
पाळून सकलमर्यादा

गैर वापर करणा-या
मात्र मिळेलं मलिदा
जपूनराहणेजरूरीचे
घेऊ शके गैरफायदा

**हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६.

# दयानंद इन्स्टिट्यूटची कु. समीक्षा कदम अविष्कार स्पर्धेत प्युअर सायन्स गटात विद्यापीठ स्तरावर द्वितीय

**लातूर/प्रतिनिधी :**स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे दिनांक ९ डिसेंबर २०२५ रोजी विद्यापीठ स्तरीय अविष्कार-२०२५-२६ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत दयानंद शिक्षण संस्था संचलित दयानंद इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, लातूरच्या बी. फार्मसी द्वितीय वर्षाच्या विद्यार्थिनी कु. समीक्षा कदम यांनी प्युअर सायन्स गटातून विद्यापीठ स्तरावर द्वितीय क्रमांक प्राप्त केला.

विद्यापीठ अंतर्गत विविध महाविद्यालयातून पदवी व पदव्युत्तर स्तरावरील जिल्हा स्तरावर निवडून आलेल्या एकूण १६८ अविष्कार पोस्टर्सचे सादरीकरण यावेळी करण्यात आले. कु. समीक्षा कदम विद्यार्थिनीने जिल्हा स्तरीय अविष्कार स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविल्यानंतर, या विद्यापीठस्तरीय स्पर्धेतही तिचा उत्कृष्ट सहभाग राहिला. तिला प्राध्यापिका प्रा. सुषमा पांचाळ यांचे मार्गदर्शन लाभले. या कार्यक्रमाच्या बक्षीस वितरण समारंभाचे अध्यक्षस्थानी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू मा. मनोहर चासकर उपस्थित होते. तसेच प्रमुख पाहुणे मा. मेघना कावली, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नांदेड, मा. राजाराम गुथले, प्रादेशिक अधिकारी एम.आय.डी.सी., नांदेड आणि मा. अभिजीत गव्हाणे, संचालक, एम. प्रीस्ट्रेस्ड पाईप प्रा. लि., नांदेड यांसह अन्य मान्यवर उपस्थित होते.

या गौरवशाली यशाबद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. लक्ष्मीरमणजी लाहोटी, उपाध्यक्ष मा. अरविंदजी सोनवणे, मा. ललितभाई शाह, मा. रमेशजी राठी, सचिव मा. रमेशजी बियाणी, संयुक्त सचिव मा. विशालजी लाहोटी, सहाय्यक सचिव मा. श्रीकांतजी उटगे, मा. अजिंक्यजी सोनवणे, आणि कोषाध्यक्ष मा. संजयजी बोरा तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाजिद चाऊस, प्राध्यापकवर्ग, इतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी कु. समीक्षा कदम यांचे कौतुक करीत उज्वल भविष्यास शुभेच्छा दिल्या.


**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**वस्तू, उत्पादन आणि पुरवठा**

विभागीय भांडार कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर आणि मा. भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने रेल्वेच्या ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट www.ireps.gov.in वर खालील कामांसाठी सक्षम, प्रतिष्ठित कंपन्या/कंत्राटदारांकडून ऑनलाइन ई-निविदा मागवीत आहेत. **निविदा क्रमांक:** ९६२५५६४५ **वर्णन:** RDSO ड्रॅग. क्रमांक T-5916 (Alt-Nil) ला पुष्टी देणाऱ्या ६०ज़स (UIC)/60E1 रेलसाठी १ मीटर लांब फिश प्लेटचे सामान, उत्पादन आणि पुरवठा. १ मीटर लांब फिश प्लेटच्या प्रत्येक संचामध्ये (i) ड्रॅग. क्रमांक T-5916 - ०२ क्रमांकांना ६ छिद्रे असलेली १ मीटर लांब फिश प्लेट, (ii) ड्रॅग. क्रमांक T-1899 ०६ क्रमांकांना बोल्ट आणि नट्स, (iii) RDSO ड्रॅग. क्रमांक T-5916 ला सिंगल कॉइल स्प्रिंग वॉशर यांचा समावेश आहे. क्रमांक T-10773-०६ क्रमांक तपशील: आयआरएस टी-१-२०२१ (पहिली सुधारणा) निविदा बंद होण्याच्या तारखेपर्यंतच्या नवीनतम बदलांसह. वापरला जाणारा अर्थ (टर्म-नवीनतम-जिथेही निविदा बंद होण्याच्या वास्तविक तारखेपर्यंतचे बदल/सुधारणा) असेल. **प्रमाण:** ३८०४ सेट. **अर्नेस्ट मनी** (INR): रु.३,६९,२४०.०० www.ireps.gov.in वर **निविदा बंद होण्याची तारीख आणि वेळ** २२-१२-२०२५ रोजी ११:३० नंतर. संभाव्य निविदाधारकांना निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी वेबसाइट वारंवार भेट देण्याचा सल्ला देण्यात येत आहे जेणेकरून या निविदेसाठी जारी केलेले कोणतेही बदल/शुद्धीपत्रक लक्षात येईल. वेबसाइट: **www.ireps.gov.in**

Apex/82 **वरिष्ठ डीएमएम/एसयूआर**

अपने जानवरों को रेल लाइन से दूर रखे



**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**ई-निविदा सूचना**

डीआरएम (एस अँड टी) यांचे कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर आणि मा. भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने रेल्वेच्या ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट **www.ireps.gov.in** वर सक्षम, प्रतिष्ठित कंपन्या/कंत्राटदारांकडून खालील कामांसाठी ऑनलाइन ई-निविदा मागवल्या आहेत:- **परिसरासह कामाचे नाव:** मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागात पादचारी भुयारी मार्गांच्या तरतूदीशी संबंधित सिग्नलिंगचे काम. **निविदा क्रमांक:** SUR-N-T-2025-26-29 कामाची अंदाजे किंमत: रु. ४,७१,३३,१९७.४९ **निविदा फॉर्मची किंमत:** शून्य **जमा करावयाची बयाणा रक्कम:** रु. ३,८५,७०० **काम पूर्ण करण्याचा कालावधी:** १२ महिने **निविदा बंद करण्याची तारीख आणि वेळ:** २९.१२.२०२५ रोजी १५.३० नंतर. तपशील ireps वेबसाइटवर उपलब्ध आहेत. शुद्धीपत्रक/दुरुस्ती असल्यास ती फक्त वरील ई-प्रोक्योरमेंट वेबसाइटवर अपलोड केली जाईल. फक्त ऑनलाइन निविदा स्वीकारल्या जातील. मॅन्युअल/पोस्टल/ई-मेल, फॅक्स, हस्तलिखित निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत. बोलीदारांना कंपनीच्या नावासह वर्ग III डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्र मिळवण्याची आणि **www.ireps.gov.in** वर नोंदणी करण्याची विनंती केली जाते. अर्नेस्ट मनी (EMD) पेमेंट नेट बँकिंग किंवा पेमेंट गेटवेद्वारे किंवा बँक गॅरंटी स्वरूपात स्वीकारले जाईल आणि मूळ बँक गॅरंटी निविदा सादर करण्याच्या शेवटच्या तारखेपूर्वी (म्हणजेच बोली सादर करण्याची शेवटची तारीख वगळून) निविदा दस्तऐवजात दर्शविल्याप्रमाणे नियुक्त केलेल्या अधिकाऱ्याला वैयक्तिकरित्या वितरित करावी. अधिक माहितीसाठी कृपया **www.ireps.gov.in** ला भेट द्या.

**डीआरएम एस अँड टी शाखा,**
**सी.आर. सोलापूर**
Apex-083

अपने जानवरों को रेल लाइन से दूर रखे



**टोनर रिफिलिंग**



फक्त ₹ ३००/-
मास्टरप्लेट
ड्रेसिंग क्वालिटी
संपर्क
8600025070
9028376965
**प्रिंटर्स पॅराडाईस**
प्रिंटर रिपेअरिंग
कॉम्पॅटिबल कार्ट्रिजेस
टोनर रिफिलिंग



निलंगा शहरातील
एलआयसी
विमा भरण्याचे केंद्र
**सितारी विमा सेवा केंद्र**
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स,
जनता दवाखान्यासमोर
शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क Off: (02384) 242224, 9422612239, 9422658396



Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26

हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६